# पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर

## दक्ष नागरिक



## सुरक्षित परिसर



**शहर सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्वाची माहिती मिळाल्यास तात्काळ खालील फोन नंबरवर कळवा.**

**पोलीस नियंत्रण कक्ष** 0240-2240500, टोल फ्री नं.-100

**व्हाट्स अप क्रमांक** 7741022222, 8390022222

## सायबर गुन्हे रोखण्यासंबंधी सुचना

- **मजबुत (Strong) पासवर्डचा वापर करा :** वेगवेगळया खात्यासाठी (अकाऊंट) वेगवेगळे युजर आयडी तसेच वेगवेगळे पासवर्ड वापरावेत. पासवर्ड टाकतांना/देतांना अक्षरे, नंबर, एखादे स्पेशल कॅरेक्टर (उदा. *@$&_) इत्यादीचा एकत्रीत वापर करावा. पासवर्ड कमीत-कमी 10 अंकी असावा. पासवर्ड दर्शनी भागी लिहून ठेवू नये तसेच पासवर्ड हा शक्यतो स्वतःचा मोबाईल नंबर ठेवू नये. पासवर्डमध्ये वेळोवेळी बदल करावा.
- **आपला संगणक सुरक्षीत करा.**
  - फायरवाल (Firewall) चा वापर करावा : फायरवाल ही काही प्रकारच्या व्हायरसेस तसेच हॅकर्सपासून संगणकास सुरक्षीत करण्याची पहिली पायरी आहे.
  - ॲन्टी व्हायरस (Anti Virus) चा वापर करावा : आपल्या संगणकात नविनतम (Latest) ॲन्टी व्हायरसचा वापर करावा. तसेच ते वेळोवेळी अद्यावत करावे.
  - ॲन्टी स्पायवेअर (Anti Spyware) चा वापर करावा : आपल्या संगणकात स्पायवेअरला घुसखोरी करण्यापासून रोखण्यासाठी आपल्या संगणकासाठी नविनतम ॲन्टी स्पायवेअर वापरावे व ते वेळोवेळी अद्यावत करावे.
- आपल्या सोशल नेटवर्क प्रोफाईल्सची (e.g. Facebook, Twitter, Youtube, MSN, Whatsapp, Hike, etc.) सेक्युरिटी सेटिंग वेळोवळी पाहून घ्यावी.
- **नविनतम संचालन प्रणाली (Operating System) चा वापर करावा :** आपल्या मोबाईल/संगणकावर व्हायरसचा संभाव्य धोका टाळण्यासाठी मोबाईल/संगणकास नविनतम संचालन प्रणाली **(Operating System)** (उदा. Windows, Mac, Linux., वापरावी. तसेच ती वेळोवेळी अद्यावत करावी.
- **बिनतारी (Wireless Network) सुरक्षीत ठेवावी :** आपले बिनतारी वायरलेस नेटवर्क योग्य प्रकारे सुरक्षीत करावे. तसेच असुरक्षित नेटवर्कवरुन आर्थिक व्यवहार करु नयेत.
- **आपली e-Identity सुरक्षीत ठेवावी :** आपली वैयक्तिक माहिती (उदा. नाव, पत्ता, फोन नंबर, आर्थिक व्यवहाराची माहिती) इंटरनेट किंवा मोबाईलवर देतांना योग्य ती काळजी घ्यावी.
- **इंटरनेटद्वारे फसवणुकीस बळी पडू नका :** कोणतीही अनोळखी लिंक/फाईल क्लिक करू नका. आपली वैयक्तिक माहिती विचारणारी, खात्री करणारी (उदा. युजर आयडी, पासवर्ड, एटीएम पिन) साईट/ई-मेल/व्यक्तीला उत्तर/माहिती देऊ नये.
- **योग्य व्यक्तीचा सल्ला/मदत घ्यावी :** जर आपणास संगणकाशी संबंधीत गुन्हयाची माहिती मिळाली किंवा आपण स्वतः अशा प्रकारच्या गुन्हयास बळी पडल्यास गोंधळून/घाबरुन न जाता नजिकच्या पोलीस स्टेशनला संपर्क साधावा. कोणतेही सॉफ्टवेअर संगणकात टाकताना (ईस्टॉल करतांना), संगणकाची दुरुस्ती करण्यासाठी मदतीची आवश्यकता भासल्यास अधिकृत/ विश्वासू संगणक तज्ज्ञाची (टेक्नीशिअन) मदत घ्यावी.
- **Pop-Ups कडे दुर्लक्ष करा :** संगणकावर अचानक येणाऱ्या पॉप-अप्स् व्हायरस असू शकतो. अशा पॉप-अप्स् डाऊनलोड केल्यास आपल्या संगणकात व्हायरस येण्याची शक्यता असते. त्यामुळे त्यांच्याकडे दुर्लक्ष करावे.
- **सोशल मिडिया (Social Media) वापरतांना काळजी घ्या :**
  कोणाच्या धार्मिक/जातीय भावना दुखावतीत असे फोटो, व्हिडिओ क्लिप्स, अश्लिल फोटो, मजकुर :-
  ▪ तयार करुन पोस्ट करु नयेत. ▪ त्यास प्रोत्साहन मिळेल अशा प्रतिक्रिया देऊ नयेत. ▪ ते फॉरवर्ड करु नये. ▪ अशा प्रकारचे कृत्य करणे हे माहिती तंत्रज्ञान कायदयान्वये गुन्हा असून अशा व्यक्तीवर माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल होऊन त्यास 03 वर्षापर्यत शिक्षा होऊ शकते. ▪ अशा प्रकारची पोस्ट निदर्शनास आल्यास तात्काळ जवळच्या पोलीस स्टेशनला संपर्क साधावा.